ॐ

# ।।श्रीकृष्णविजय।।

(नित्यपाठ)

प्रा. गुरुनाथ वि. मुंगळे

गायगौरी प्रकाशन

वरुणतीर्थ मार्ग, कोल्हापूर-४१६ ०१२

||श्री||

# पठणापूर्वी

||श्री||

श्रीकृष्णसरस्वतीदत्तमहाराज, कोल्हापूर यांचा हा नित्यपाठ भाविक सद्भक्तांच्या हाती देताना मन भक्तिप्रेमाने भरून येत आहे. गायगौरी प्रकाशनाचे हे द्वितीय अक्षरपुष्प असून त्याचा स्वीकार वाचकवर्ग उत्कट प्रेमाने करेल यात शंका नाही. श्रीकृष्णसरस्वतीदत्तमहाराजांचे एक सविस्तर गद्य चरित्र लवकरच प्रकाशित करण्याची इच्छा आहे. तसा संकल्प त्यांच्या चरणी करत आहोत. त्याची पूर्ति त्यांनीच करावयाची आहे. मूळ वस्तूच चिन्मय असल्याने कोणत्याही अक्षरकोंदणात ती सुशोभित झाल्याशिवाय रहाणार नाही. या पुस्तक छपाईचे काम राजहंस प्रिंटिंग प्रेसचे श्री गोसावी यांनी सद्गुरुप्रेमाने केले आहे. त्याचप्रमाणे या अक्षर मंदिराचे प्रवेशद्वार सुशोभित करण्याचे कार्य विश्वविख्यात चित्रकार श्री पी. सरदार यांनी आपल्या भावबलाने केले आहे. त्यांचे आम्ही आभार मानण्यापेक्षा श्रीगुरुनींच आपली कृपाछाया त्यांच्यावर अधिक घनसांद्र करावी अशी प्रार्थना करत आहे. हा नित्यपाठ प्रकाशित करताना ज्यांची कळत न कळत मदत झाली त्या सर्वांचे भक्तिऋण सद्गुरुनी स्वीकारावे अशी प्रभूचरणी प्रार्थना. नामोल्लेख करण्याचा मोह होत असूनसुद्धा सद्गुरुभक्तांना असे करणे रुचण्यासारखे नसल्याने तो या ठिकाणी करत नाही. चैतन्यधारानंतरचे हे प्रकाशन भाववृद्धीस उपयोगी पडो अशी प्रार्थना करून ही कृती सद्गुरुना समर्पण करीत आहोत.

- सौ. शैलजा गु. मुंगळे,
कोल्हापूर.

॥श्री॥ # प्रार्थना ॥श्री॥

गेल्या शतकामध्ये कोल्हापुरात श्रीकृष्णसरस्वतीदत्तमहाराज या नावाचे महान् दत्तावतारी सत्पुरुष होऊन गेले. भगवंताच्या अवतारलीलांचा विचार करता दत्तावतार हा अविनाशी असल्याने 'संभवामि युगे युगे' या भगवद्वचनाची साक्ष या ना त्या दत्तावतारी विभूतींच्या माध्यमातून प्रचीतीस येते. श्रीकृष्णसरस्वतीदत्तमहाराज यांच्या चरित्रलीला कथन करणारा व भक्तांचा भाव वाढवणारा 'श्रीकृष्णविजय' हा ग्रंथ सर्वपरिचित आहे. दैनंदिन वाचनासाठी म्हणून हे संक्षिप्त चरित्र श्रीगुरुकृपेने सादर करीत आहोत. या चरित्रलेखनास कै. श्री मुजुमदार यांचा ग्रंथ श्रीगुरुंच्या लीला शब्दांकित करण्यासाठी प्रमुख संदर्भ म्हणून वापरला आहे. श्रीकृष्णसरस्वतीदत्तमहाराज यांच्या ठिकाणी आत्मविद्या पूर्णांशाने विसावली असल्याकारणाने त्यांचे जीवन लोकोत्तर व अचिंत्यमहिमान होते. श्रीमहाराज स्वत:च 'विश्वमांगल्याचे अधिष्ठान असल्याने त्यांच्या ठिकाणी असलेल्या असाधारण गुणोत्कर्षाने ते अनेकांचे भावजीवनसम्राट झाले आहेत; होत आहेत व होत रहातील. त्यांच्या चरित्रामध्ये अनेक गोष्टी तर्कविसंगत अशा आढळतात तथापि 'अचिन्त्या खलु ये भावा न तांस्तर्केण साधयेत' या वचनाला अनुसरून बऱ्याच वेळा निष्ठेला आवाहन केल्याशिवाय व अंत:करणात श्रद्धेची जोपासना केल्याशिवाय लोकोत्तर विभूतींच्या चरित्राची प्रचीति केवळ अंगुली मुखात घालण्याइतपत येते व असे वाटते की हे काम आपले नाही. ईश्वरप्रेमाच्या अनुभूतिसाठी ईश्वरविषयक विलक्षण तळमळ हवी असा बोध

परमार्थक्षेत्रांतील सर्वच जाणत्यानी केला आहे. या बोधामागील सूत्र लक्षात घेऊन संतचरित्रात अवगाहन केले तर प्रचीति आल्याशिवाय रहात नाही असेही 'हे तो आहे सप्रचीत' असे म्हणणाऱ्या समर्थांसारख्या संतांनी निश्चयाने प्रतिपादन केले आहे. संतग्रंथांचे वाचन, चिंतन व मनन भगवंताचे नामस्मरण यासारख्या गोष्टींनी परमार्थप्रचीति दृढ होण्यास मदत होते व साधकाचे भावविश्व समृद्ध होते, असेही अनेक ज्ञानीयांचे मत आहे. हा सर्वच विचार करत असताना केवळ चमत्कार म्हणजे परमार्थ नव्हे ही गोष्ट प्रामुख्याने लक्षात ठेवणे आवश्यक आहे. चमत्कारामुळे भाविकांची भावदशा तात्कालिक समृद्ध होत असली तरी अशी अवस्था म्हणजे परमार्थमार्गाचे परमउद्दिष्ट नाही हे ध्यानात ठेवले पाहिजे. म्हणून लोकोत्तर विभूतींच्या बाबतीत त्यांचे अनुसंधान कसे साधावे याविषयी सांगताना सामान्यजनांना परमपूजनीय वासुदेवानंद सरस्वती महाराज यांनी असा बोध केला आहे की, अशा महात्म्यांची बोधवचने फक्त घ्यावीत व त्यांच्या विसंगत आचरणाचा विचार करू नये. श्रीगुरुप्रेमात वाढ होण्यासाठी या संक्षिप्त चरित्राचा उपयोग होवो अशी प्रार्थना श्रींच्या संजीवक चरणांना करत आहे. या चरित्रातील पांच-दहा ओव्या जरी नित्यपठणात राहिल्या तरी चित्तशुद्धीसाठी त्याचा उपयोग होईल. एका दिवसात हा संपूर्ण अध्याय वाचून काढल्यास श्रीचरित्रपारायणाचा आनंद मिळेल व सात दिवसात रोज एकदा याप्रमाणे अध्याय वाचल्यास सप्ताहाचा आनंद मिळेल. पारायणकालात व सप्ताहकालात सर्वतोपरी शुचिर्भूत राहिल्याने उपासना अधिक तेजोमय होईल. पारायण व सप्ताहविधींत रोज प्रातःकाळी व

सायंकाळी आरती, नामस्मरण वगैरे चालू ठेवावे, श्रद्धा व भक्तीच्या वाढीसाठी, दृढ उपासनेसाठी, संपन्न अशा प्रपंच व परमार्थासाठी या श्रीकृष्णसुधेचे पान साधकाचा भावपिंड पुष्ट करण्यास, त्याचे मनोदौर्बल्य नष्ट करण्यास, त्याचे धारिष्ट्य वाढविण्यास, त्याच्यावरील आपत्ती दूर करण्यास उपयोगी पडो अशी प्रार्थना करून हे अक्षरपुष्प श्रीकृष्णसरस्वती यांच्या चरणी भक्तिभावाने पूर्ण शरणागतीने समर्पित करत आहे.

- प्रा. गुरुनाथ वि. मुंगळे,
कोल्हापूर.